**वादीतर्फे सा.क्र.८ (नि.क्र.४५७)**

**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-** अब्दुल रशीद बापुसाहेब पाटील , **वय:-** ६० वर्षे,

**व्यवसाय:-** खाजगी नोकरी , **रा.**सोलापूर.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यावतीने शपथेवर सुरु.</u>**

**०१.** वर्धमान पॉली एक्सट्रुजन, एम.आय.डी.सी, सोलापूर येथे माकेर्टींग हेड म्हणून मी कार्यरत आहे. कोठारी ॲग्रीटेक प्रा.लि. मध्ये मी २००४ ते २०१४ माकेर्टींग हेड आणि तांत्रिक सल्लागार म्हणून कार्यरत होतो. शेतीच्या सिंचनासाठी आवश्यक सर्व साहित्य या दोन्ही कंपन्यामध्ये तयार होते. माझ्या नोकरीचे स्वरुपच बाजारपेठेशी निगडीत असल्याने मी सतत फिरत असे. वादी नोकरीच्या निमीत्ताने आमच्या फॅक्ट्रीत काही साहित्याच्या चौकशीसाठी आले होते. तेथे त्यांनी त्यांच्या शेताकरीता ठिंबक सिंचन करायचे असल्याबद्दल सांगितले. त्यामुळे, त्यांनी दिलेल्या पत्त्यावर कोपरा, ता. अहमदपूर येथे मी त्यांच्या भेटीच्या दुसऱ्याच दिवशी आलो. मी वादींच्या शेतावर भेट दिली. त्यांच्याकडे डाळींब लागवड होती, त्याकरीता ड्रीप एरीगेशन करायचे असे ते म्हणाले. त्याकरीता मी त्यांच्या पुर्ण शेताचे मोजमाप केले. साधारण ७० एकर ती बाग होती. तसे त्याचे डिझाईन तयार करुन मी त्यांना साहित्याचे कोटेशन दिले. कोटेशनप्रमाणे माल पुरवा असे वादींनी मला सांगितले. त्याप्रमाणे आम्ही माल पुरवला. मेन लाईन पी.व्ही.सी., फिल्टर, लॅट्रल, ड्रीपर व पी.व्ही.सी. फिटींग साहित्य त्यांना पुरवले. या साहित्याची जोडणी करण्यासाठी संबंध टिम मीच सोलापूरातून पाठवून दिली. त्यांच्यावर देख-रेख करण्याचे काम मी केले. वादीच्या शेताला लागून नदी व शेताच्या मध्ये एक ओढयात बांधलेली विहीर असे दोन पाण्याचे स्त्रोत वादीला उपलब्ध होते. धरणावरुन वादीने दोन पाईप लाईन शेतापर्यंत आणल्या होत्या. ७० एकर क्षेत्राला सदर सिंचन व्यवस्था मी करुन दिली. अंबाजोगाई- अहमदपूर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सदर ७० एकर क्षेत्र विभागले गेले होते. २००४

ते २०१० या काळात ८ ते १० वेळा मी वादीच्या क्षेत्राला भेट दिली. या ७० एकर क्षेत्राच्या आजुबाजूला कोठेही डाळींब पीकासाठी ड्रीप एरीगेशन नव्हते. सदरची ७० एकरची मिळकत कोणाची आहे, याबाबत माझे वादीशी बोलणे झाले नाही. सदर सिंचन व्यवस्था सुरु करुन पुर्ण करेपर्यंत मला कोणीही हरकत उभारली नाही. वादीकडे त्यावेळी गोठा आणि गोठयातील जनावरे होती. वादीच्या शेतात ७-८ पुरुष व १२-१५ स्त्रीया शेतात राबायला असायच्या. वादीकडे हडबे नावाचे मॅनेजर होते. ते माझ्याशी वादीशिवाय संपर्क करीत. या योजनेचा संपुर्ण खर्च वादीने केला.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.बी.एन.पौळ यांच्यावतीने सुरु.</u>**

**०२.** मी कोठारी ॲग्रीटेकमध्ये कार्यरत असल्याबद्दल आजरोजी कागदोपत्री पुरावा आणलेला नाही. हे खरे की, आजरोजी मी वादीस विकलेल्या मालाची बीले आणलेली नाहीत. मला कंपनीने साक्षीला येण्यासाठी पत्र दिले होते. उज्वल कोठारी हे त्याचे मुख्य डायरेक्टर होते. पुष्कराज कोठारी हे माकेटींग डायरेक्टर होते. हे खरे नाही की, ड्रीपचे मटेरीयल वादीने कोठारी ॲग्रीटेककडून खरेदी घेतलेले नाही. वादीला भाऊ आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. सदर ७० एकर जमीन कोणाच्या मालकीची होती हे मला माहिती नाही. त्यात कब्जा कोणाचा होता, हे मला सांगता येणार नाही. त्याच्या चतु:सीमा मला सांगता येणार नाहीत. हे खरे नाही की, मी स्वत: या क्षेत्राला सिंचन व्यवस्था करुन दिली, असे मी खोटे सांगत आहे. त्या विहिरीची मालकी कोणाची हे मला सांगता येणार नाही. हे खरे की, आजरोजी मी साहित्याची कागदपत्रे आणलेली नाहीत. सदर ड्रीप कधी केले याची निश्चित तारीख मला सांगता येणार नाही. त्यांनी मला धनाकर्ष दिला होता. उर्वरीत रक्कम रोख स्वरुपात होती. त्या सिंचनासाठी अनुदान उपलब्ध असूनही वादीने घेतले नाही. आता मला नि.क्र.४५४/१ हा कागद दाखवला. त्यातील टिप बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.४५८</u>** देण्यात येते. नि.क्र.४५८ हा वादीच्या सांगण्यावरुन दिला, हे खरे नाही. आता मला नि.क्र.४५४/२ हा कागद

**वादीतर्फे सा.क्र.८ (नि.क्र.४५७)**

दाखवला. त्यातील मजकुर वादीच्या सांगण्यावरुन लिहिला हे खरे नाही. मी वादीचा मित्र असल्याने खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

दिनांक:१०/०२/२०२६.